पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-८
सभावृत्तांत

दि.- ६/ ११ /२०१३ वेळ- दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ६/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.गव्हाणे सुरेखा शंकर अध्यक्षा
2. मा.आल्हाट मंदा उत्तम
3. मा.काळजे नितीन प्रताप
4. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
5. मा.मडिगेरी वर्षा विलास
6. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
7. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
8. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
9. मा.गोफणे अनुराधा देविदास
10. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
11. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
12. मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
13. मा.लोंढे शुभांगी संतोष
14. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
15. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
16. मा.शेंडगे आशा सुखदेव
17. मा.मोटे किरण बाळासाहेब
18. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
19. मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.श्रीनिवास दांगट-प्रशासन अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-कार्यालयीन अधिक्षक, मा.वसंत साळवी- कार्यकारी अभियंता, स्थापत्य मा. संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता, पापू, श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्री.भोकरे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.घुबे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.बोत्रे- उपअभियंता स्थापत्य, श्रीमती पाठक- उपअभियंता ड्रेनेज, श्री.देशमुख-उपअभियंता, विदयुत.

मा.अध्यक्षा- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

-----

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.</u>

विषय क्रमांक -१ ) प्र.क्र.६३ मध्ये आरक्षण क्र. २५ येथे मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या लॉन टेनिस फोर्टला छत्रपती राजश्री शाहू महाराज लॉन टेनिस फोर्ट असे नामकरण करणेबाबत- मा.किरण मोटे व मा.चंद्रकांत वाळके यांचे दि. ६/११/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक - २)   नामफलक व विकास कामाबाबत- मा.मंदा आल्हाट यांचे
दि.६/११/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -३)   विहार दर्शक बोर्ड लावणेबाबत- मा.राहुल भोसले व मा.चंद्रकांत
वाळके यांचे दि. ६/११/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक -४)   प्रभाग क्र. ३४ गव्हाणे वस्ती येथील पी.सी.एम.टी.चौकातील डॉलफिन
मासा व संरक्षण कठडा काढणेबाबत-मा.सुरेखा गव्हाणे व मा.श्रध्दा
लांडे यांचे दि.६/११/२०१३ चे पत्र.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

सूचक- मा.मंदाताई आल्हाट                                अनुमोदक- मा.शकुतंला बनसोडे

दि. ६/११/२०१३ ची मा.प्रभाग समिती सभा दिवाळीसणा निमित्त तहकूब करुन दि. १३/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता घेणेत यावी.

-------

मा.अध्यक्ष-  बुधवार दि. १३/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत
येत आहे.

-------

सही/-
(गव्हाणे सुरेखा शंकर)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-८
सभावृत्तांत
(दि. ६/११/२०१३ ची तहकूब सभा)

दि.- १३/ ११ /२०१३ वेळ- दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची दि. ६/११/२०१३ ची तहकूब सभा बुधवार दि. १३/११/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

1. मा.गव्हाणे सुरेखा शंकर अध्यक्षा
2. मा.आल्हाट मंदा उत्तम
3. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
4. मा.काळजे नितीन प्रताप
5. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
6. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
7. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
8. मा.सुपे आशा रविंद्र
9. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
10. मा.गोफणे अनुराधा देविदास
11. मा.महेशदादा किसन लांडगे
12. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
13. मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
14. मा.लोंढे शुभांगी संतोष
15. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
16. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
17. मा.भोसले राहूल हनुमंत
18. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
19. मा.शेंडगे आशा सुखदेव
20. मा.मोटे किरण बाळासाहेब
21. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
22. मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.श्रीनिवास दांगट-प्रशासन अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-कार्यालयीन अधिक्षक, मा.वसंत साळवी-कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता पापू, मा.मकरंद निकम- कार्यकारी अभियंता ड्रेनेज, श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्री.लगस- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोकरे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.काळे- उपअभियंता, स्थापत्य, श्री.एच.एस.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, श्री. राजेंद्र शिंदे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.घुबे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्रीमती पाठक- उपअभियंता ड्रेनेज, श्री. भंडारी-

क.अभियंता, (स्थापत्य), श्री.निंबाळकर आर.आर. -क.अभियंता, विदयूत, श्री.क्षीरसागर- क प्रभाग स्थापत्य, श्री.गवळी- क प्रभाग , स्थापत्य, श्री.देवकर- झोनिपु स्थापत्य.

-----

मा.अध्यक्षा- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.
मा.सचिव (श्री.श्रीनिवास दांगट) - मा.वर्षाताई मडिगेरी यांनी दि. ६/११/२०१३ रोजी पत्र दिलेले आहे त्यामध्ये – "पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्रमांक-२९ इंद्रायणीनगर मध्ये समाविष्ट सेक्टर क्रमांक १० च्या भागास या पूर्वीच "श्रीराम कॉलनी " असे नामकरण ठराव क्रमांक ७३ विषय क्रमांक ६ दिनांक २/११/२०११ याद्वारे केला असल्याने नियमानुसार पुन्हा नविन ठराव करता येणार नाही त्यामुळे **ठराव क्रमांक ९८ विषय क्रमांक ४ दिनांक ३/१०/२०१३** केलेला हा ठराव कायम करण्यात येऊ नये " असे पत्र दिलेले आहे.
मा.अध्यक्षा- दिनांक ३/१०/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.७) सभावृत्तांतामधील- **" ठराव क्रमांक ९८ विषय क्रमांक ४ " वगळून दिनांक ३/१०/२०१३** रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

--------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक -११० विषय क्रमांक – १
दिनांक - १३/११/२०१३ विभाग-स्थापत्य क
सूचक- मा.किरण मोटे अनुमोदक-मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.किरण मोटे व मा.चंद्रकांत वाळके यांचे दि. ६/११/२०१३ चे पत्र.

प्र.क्र.६३ मध्ये आरक्षण क्र. २५ येथे मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या लॉन टेनिस फोर्टला छत्रपती राजश्री शाहू महाराज लॉन टेनिस फोर्ट असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला-

-----

ठराव क्रमांक -१११ विषय क्रमांक – २
दिनांक - १३/११/२०१३ विभाग- विदयुत / स्थापत्य क
सूचक- मा.मंदा आल्हाट अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ- मा.मंदा आल्हाट यांचे दि. ६/११/२०१३ चे पत्र.

१) मोशी प्रभाग क्र. ६ स्पाईन रोडच्या चौकात हॅलोजनचे दिवे बसविणेस २) सहयोग कॉलनी याठिकाणी सिमेंटच्या पाईपची मुतारी बसविणेस ३) मोशी आळंदी रोडवर बाबुराव कॉम्प्लेक्सच्या जवळ **बाजीराव गायकवाड (भिम नगर)** असे नामफलक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला-

-----

ठराव क्रमांक -११२ विषय क्रमांक – ३
दिनांक - १३/११/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.राहुल भोसले अनुमोदक-मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ- मा.राहुल भोसले व मा.चंद्रकांत वाळके यांचे दि.६/११/२०१३ चे पत्र.

नेहरुनगरमध्ये वसंतदादा पाटील शाळे शेजारी सर्वात जुने बुध्द विहार आहे, सदर बुध्द विहारामध्ये अनेक कार्यक्रम होत असतात त्यासाठी पुणेहून व पिंपरी चिंचवड

शहराच्या कानाकोप-यातून धार्मिक लोक येत असतात. त्यावेळी बुध्द विहार शोधताना त्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

तरी नेहरुनगर मधील जैन चौकात सेवा विकास बँकेच्या शेजारी **शील रतन बुध्द विहाराकडे** असे विहार दर्शक बोर्ड लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला-

-----

ठराव क्रमांक -११३ विषय क्रमांक – ४
दिनांक - १३/११/२०१३ विभाग- विदयुत / स्थापत्य क
सूचक- मा.सुरेखा गव्हाणे अनुमोदक-मा.श्रध्दा लांडे
संदर्भ- मा.सुरेखा गव्हाणे व मा.श्रध्दा लांडे यांचे दि.६/११/२०१३ चे पत्र.

प्रभाग क्रमांक ३४ मधील गव्हाणे वस्ती येथील पीसीएमटी चौकामध्ये हायमास्ट दिवा बसविणेचे प्रयोजन असल्याने व त्याठिकाणचा डॉलफिन मासा नादुरुस्त झालेला असल्याने तो व संरक्षण कठडा काढणेस मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(गव्हाणे सुरेखा शंकर)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कप्रस/कावि/ ५१७ /२०१३
दि. ३०/ ११ /२०१३



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.